



दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २४१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१३ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## ‘मोठ्या पक्षाकडून सत्तेतल्या मित्रांचीच शिकार होणार’, रोहित पवार यांचा दावा





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, पुणे :** भाजप आणि मित्रपक्षांबाबत सूचक इशारा देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केलेल्या वक्तव्यावर शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर देत टोला लगावला आहे. त्यांनी त्यांच्या पक्षाचा विचार करावा, आमच्याबद्दल काळजी करण्याची गरज नाही, असे स्पष्ट शब्दांत श्रीकांत शिंदेंनी म्हटले.

पुण्यात माध्यमांशी बोलताना श्रीकांत शिंदे यांनी ही प्रतिक्रिया दिली. रोहित पवार यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये भाजप भविष्यात मित्रपक्षांचीच ‘शिकार’ करेल, असा दावा केला होता. या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात चर्चा रंगल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर श्रीकांत शिंदे यांनी विरोधकांच्या टीकेला थेट उत्तर देत सांगितले की, प्रत्येक पक्ष आपली ताकद वाढवण्यासाठी काम करत असतो. आम्हीही आमच्या पक्षाच्या संघटनावर लक्ष केंद्रीत केले आहे. बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहोत. त्यांनी स्पष्ट केले की, शिवसेनेत संघटन बळकट करण्यासाठी नियोजनबद्ध काम सुरू आहे आणि त्यासाठी अशा बैठका सातत्याने घेतल्या जाणार आहेत.

रोहित पवार यांनी केलेल्या ‘मित्रपक्षांची शिकार’ या विधानावर भाष्य करताना शिंदे यांनी विरोधकांना आपल्या पक्षातील घडामोडींवर लक्ष देण्याचा सल्ला दिला. आमच्याबाबत चिंता करण्यापेक्षा त्यांनी त्यांच्या पक्षात काय चाललंय ते पाहावं, असा थेट टोला त्यांनी रोहित पवार यांना लगावला.

दरम्यान, श्रीकांत शिंदे म्हणाले की, पुढील तीन वर्षांत कोणत्याही निवडणुका नसल्यामुळे हा काळ संघटन मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वॉर्डनिहाय बैठका घेऊन कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचणार आहोत. मतदार निसटू नयेत यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम केले जाईल, असे त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे प्रश्न ऐकून घेणे आणि पक्षाची बांधणी मजबूत करणे, हा या बैठकीमागील उद्देश असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**पंढरपुरात मोठा उलटफेर, भगीरथ भालके यांचा शिवसेनेत पक्षप्रवेश**

दरम्यान, पंढरपूरच्या राजकारणात मोठा उलटफेर बघायाल मिळत आहे. भगीरथ भालके यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत भूमिका मांडली आहे. जशी भगीरथाने गंगा पृथ्वीवर आणली, तसेच भगीरथ भालके हे पंढरपूरात विकासाची गंगा नक्की आणतील. त्यांच्या प्रवेशामुळे पंढरपूर, मंगळवेढा आणि माढा परिसरात शिवसेनेची ताकद वाढणार असून भालके यांच्या खांद्यावरचा भगवा झेंडा हा फक्त शिवसेनेचा नसून तो भागवत धर्माचा, प्रभू श्रीरामांचा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या परंपरेचा आहे. अनिल सावंत आणि तानाजी सावंत यांचा उल्लेख करत काका-पुतण्याचे राजकारण महाराष्ट्राने पाहिले आहे, पण हे दोघे शिवसेनेत एकदिलाने काम करतील, असा विश्वास एकनाथ शिंदेंनी याप्रसंगी व्यक्त केला.

ऑपरेशन टायगर वगैरे काही नाही. काही चॅनलवालेच डरकाळी फोडत आहेत. ती ऐकून काही जण म्याव-म्याव करत आहेत. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या तसेच वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांमुळे आणि भगव्याच्या शानमुळेच दररोज हजारो नेते लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते शिवसेनेसोबत जोडले जात आहेत, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

## स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांचं निधन !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मुंबई :** भारताच्या आणखी एका स्वरसम्राज्ञीचा प्रवास अखेर कायमचा थांबला. मागची अनेक दशकं भारतीयांच्या मनावर आपल्या सुरेल आवाजाने अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झालं. प्रकृती बिघडल्यामुळे आशा भोसले यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

छातीत दुखू लागल्यानं त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं. अलीकडेच त्यांना प्रचंड थकवा जाणवू लागला होता, असंही समजतंय. अखेर सूरांचा हा तारा आज कायमचा हरपला असून बॉलीवूडसह संपूर्ण संगीत क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

## राहुरीत महायुती कार्यकर्त्यांचा उत्साही मेळावा; कर्डिले विजयाचा निर्धार...



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१२, राहुरी :** राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द येथे डिग्रस व बारगाव नांदूर परिसरातील भाजप महायुती कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यास भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. विखे पाटील यांनी आगामी निवडणूक गट-तट न पाहता सर्वांनी एकत्र येऊन लढवण्याचे आवाहन केले. स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांना अभूतपूर्व मताधिक्याने विजयी करून खरी श्रद्धांजली अर्पण करावी, असे त्यांनी नमूद केले. या संवाद मेळाव्यास महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रचंड परिश्रमामुळे कर्डिले साहेबांना मोठ्या मताधिक्याने विजय मिळाला होता. मात्र त्यांच्या अकाली निधनामुळे ही पोटनिवडणूक अनपेक्षितपणे समोर आली असून, ही निवडणूक केवळ राजकीय नसून भावनिक आणि जबाबदारीची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

राहुरी तालुक्याशी विखे पाटील कुटुंबाचे घट्ट नाते असून, मतदारसंघातील विविध विकासकामांचा त्यांनी आढावा घेतला. नगर-मनमाड रस्त्यासह अनेक प्रश्न सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच काही विरोधकांवर टीका करत, काही लोक फक्त फोटो आणि व्हिडिओ काढण्यासाठी येतात, असा टोला त्यांनी लगावला. पद असो वा नसो, काम करण्याची भूमिका महत्त्वाची असते, असेही ते म्हणाले.

यावेळी तनपुरे परिवाराने दाखवलेल्या राजकीय मोठेपणाचे त्यांनी कौतुक केले. संयम, समन्वय आणि परस्पर सन्मान राखत सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे व गावपातळीवर प्रचार अधिक प्रभावी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

मेळाव्यात उपस्थित कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेत अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी पूर्ण ताकदीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## भिवंडीत अनधिकृत शाळांचा सुळसुळाट!

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१२, भिवंडी :** भिवंडी तालुक्यात अनधिकृत शाळांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने तब्बल २१ बेकायदेशीर शाळांची यादी जाहीर करत कारवाईचा इशारा दिला आहे.या निर्णयामुळे आता या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

भिवंडीत गेल्या काही दिवसात अनधिकृत शाळांची संख्या १८ वरून २१ वर पोहोचली ही अतिशय चिंतेची बाब असून

संबंधित सर्व बेकायदेशीर शाळांना नियम न पाळल्यास फौजदारी कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

याच दरम्यान या शाळांमधील विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शासनमान्य शाळांमध्ये समायोजनाची तयारी देखील करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यात झपाट्याने होत असलेल्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर भिवंडीत देखील अनधिकृत बांधकामांबरोबरच अनधिकृत शाळांचाही प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनू लागला आहे.या सर्व शाळा सर्व शासकीय नियम धाब्यावर बसवून परवानगीशिवाय सुरू असून, अशा शाळांची संख्या देखील दिवसेंदिवस झपाट्याने वाढत असल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे दिसत आहे.

दरम्यान याच पार्श्वभूमीवर भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने तब्बल २१ अनधिकृत शाळांची अधिकृत यादी जाहीर करत कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. पालिकेच्या माहितीनुसार, गेल्या वर्षी शहरात १८ अनधिकृत शाळा सुरू होत्या. मात्र वर्षभरात आणखी तीन शाळांची भर पडल्याने हा आकडा २१ वर



पोहोचला आहे. ही वाढ चिंताजनक मानली जात असून, नियमांचे उल्लंघन करून सुरू असलेल्या या शाळांवर आता कठोर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट संकेत पालिकेकडून देण्यात आले आहेत.

प्राथमिक शिक्षण विभागाने संबंधित शाळा प्रशासनाला नोटिसा बजावत स्पष्ट इशारा दिला आहे की, तात्काळ शाळा बंद कराव्यात, अन्यथा संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी या शाळांमध्ये आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊ नयेत, असे आवाहनही पालकांना करण्यात आले आहे. या अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येऊ नये, यासाठी पालिकेने पर्यायी व्यवस्था करण्याचाही निर्णय घेतला आहे. अशा शाळातील विद्यार्थ्यांचे समायोजन शासनमान्य शाळांमध्ये करण्यात येणार असून, शिक्षणात खंड पडू नये यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

यंदा देखील नव्याने समाविष्ट झालेल्या शाळांमध्ये ए. बी. इंग्रजी प्राथमिक शाळा (भैरव सायझिंग समोर), विद्या निकेतन इंग्रजी प्राथमिक शाळा (भंडारी कंपाऊंड) आणि सरस्वती इंग्रजी प्राथमिक शाळा (नवी वस्ती) यांचा समावेश करण्यात आला आहे. शहरात परवानगीशिवाय सुरू असलेल्या अशा शाळांमुळे शिक्षणाच्या दर्जावर परिणाम होत असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याशी खेळ होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे पालकांनी सजग राहून केवळ शासनमान्य शाळांमध्येच आपल्या पाल्यांना प्रवेश द्यावा, असे आवाहन पुन्हा एकदा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

अनधिकृत शाळा चालविणाऱ्यांच्या विरोधात दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरोधात लवकरच फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार असल्याचेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. गेल्या वर्षी जाहीर करण्यात आलेल्या १८ शाळामध्ये यंदाही समावेश असून त्यात रॉयल इंग्रजी शाळा (पटेल कंपाउंड, धामणकर नाका), नोबेल इंग्रजी शाळा (अवचितपाडा), अलरजा उर्दू प्राथमिक शाळा (गैबी नगर), मराठी प्राथमिक शाळा (पाईपलाईन टेमघर), इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शाळा (पाईपलाईन टेमघर), द लर्निंग प्राथमिक शाळा (टेमघर पाडा), एकता इंग्रजी पब्लिक शाळा व एकता उर्दू पब्लिक शाळा (फातमा नगर, नागांव), ए.आर. रेहमान उर्दू प्राथमिक शाळा, जवेरिया उर्दू प्राथमिक शाळा (गैबी नगर), विवेकानंद इंग्रजी माध्यमिक शाळा (नवी वस्ती), डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम इंग्रजी प्राथमिक शाळा (रावजी नगर, पॉवर हाऊस जवळ), अलहिदाया पब्लिक प्राथमिक शाळा (पटेल नगर, बाळा कंपाउंड), तहजीब इंग्रजी प्राथमिक शाळा (जैतनपुरा), इकरा इस्लामिक मकतब शाळा (नदी नाका), कैसर बेगम इंग्रजी शाळा (नागांव, सहारा हॉटेल जवळ) आदी शाळांचा यात समावेश आहे.

## प्रयत्न केले तरच मुख्यमंत्रिपद शक्य : भुजबळ



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नाशिक :** आपल्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री व्हावा, असे प्रत्येक पक्षाला वाटते. अनेक राज्यांत महिला मुख्यमंत्री झाल्या. यापूर्वी अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत असे वाटायचे. आता सुनेत्रा पवार व्हाव्यात असे वाटते. परंतु, त्यादृष्टीने प्रयत्न करावे लागतील, तरच पुढे जाणे शक्य आहे. अन्यथा आहे तिथेच राहावे लागेल, असे वक्तव्य अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी रविवारी (दि.१२) केले.

भुजबळ यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. ते म्हणाले, ‘मी तीन वेळा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. किमान दोन-तीन वेळा माझे मुख्यमंत्रिपद हुकले. जाणूनबुजून मी तो निर्णय घेतला. मी भुजबळांना मुख्यमंत्री करणार होतो, असे मी शिवसेना सोडली तेव्हा बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते.’ सुनेत्रा पवारांना मुख्यमंत्री झालेले पाहायचे आहे, असे अदिती तटकरे म्हणाल्याबाबत भुजबळांचे लक्ष वेधण्यात आले. ते म्हणाले, ‘आपल्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री व्हावा असे प्रत्येक पक्षाला वाटते. सुनेत्रा पवार यांना केवळ एक पायरी पुढे जायचे आहे. अशी परिस्थिती कदाचित येऊ शकते. अनेक ठिकाणी महिला मुख्यमंत्री झाल्या असून, सुनेत्रा पवारही मुख्यमंत्री व्हायला हव्यात. अपेक्षा केली व त्या दृष्टीने प्रयत्न केले तरच पुढे जाणे शक्य होते. याचा अर्थ काहीतरी बंड करायला हवे असं नाही,’ असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

**सगळ्या कंपन्या बंद करायच्या का?**

बहुराष्ट्रीय कंपनीत घडलेल्या प्रकाराची गंभीर दखल पोलिस आयुक्तांनी घेतली आहे. नाशिकमध्ये अशा किती कंपन्यांमध्ये असे प्रकार सुरू आहेत,’ असा सवाल भुजबळ यांनी माध्यमांना केला. ‘एखाद्या कंपनीत असा प्रकार घडला असेल म्हणून सगळ्या कंपन्या घालवायचा विचार आहे का,’ असा सवाल त्यांनी माध्यमांना केला.

## भाजपा महानगर कार्यालयात विविध कार्यक्रमांच्या नियोजनासाठी बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** पंडित दीनदयाल प्रशिक्षण महाअभियान जिल्हा प्रशिक्षण वर्ग, एसआरआय अभियान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती तसेच २६ एप्रिल रोजी होणाऱ्या ‘मन की बात’ कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगरतर्फे गांधी चौक येथील पक्षाच्या महानगर कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आ. किशोर जोरगेवार प्रामुख्याने उपस्थित होते. यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, प्रदेश कार्यकारिणी सदस्य तुषार सोम, महामंत्री रवींद्र गुरुनुले, मनोज पाल, सविता दंढारे, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, भाजप नेते प्रकाश देवतळे, मनपा गटनेते शेखर शेट्टी, बलराम डोडाणी, नगरसेविका सविता कांबळे, सारिका संदुरकर, आशा देशमुख, सरला कुळसंगे, ज्योती जिवने, शीतल गुरुनुले, अनुजा तायडे, नगरसेवक संजय कंचर्लावार, नितेश गवळी, जितेश कुळमेथे, घुग्घूस शहर अध्यक्ष संजय तिवारी, मंडळ अध्यक्ष स्वप्निल डुकरे, विनोद खेवले, सुभाष अदमाने, प्रदीप किरमे, आशिष मासिरकर, सुचिता लुटे, मीना मोरपाका, वैशाली ढवस,



राम वर्मा, गणेश पिंपळकर आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

बैठकीत आगामी कार्यक्रमांचे सविस्तर नियोजन, जबाबदाऱ्यांचे वाटप तसेच संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यात आला. विशेषतः पंडित दीनदयाल प्रशिक्षण महाअभियानाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांची कौशल्यवृद्धी, एसआरआय अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजन, तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ही केवळ राजकीय पक्ष नसून ती विचारांची आणि कार्यकर्त्यांच्या ताकदीवर उभी असलेली संघटना आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या जबाबदाऱ्या समजून घेत त्या प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. आगामी सर्व कार्यक्रम हे समाजाशी थेट संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहेत. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमात जनसंपर्क वाढवून पक्षाची विचारसरणी जनतेपर्यंत पोहोचवावी, असे त्यांनी सांगितले.




## मधमाश्यांचे हल्ले पर्यटनाच्या मुळावर

जगप्रसिद्ध अजिंठा, वेरूळ लेणी देश – विदेशातील पर्यटकांना भुरळ घालतात. दोन्ही लेण्यांमधील शिल्पं व चित्रं पाहण्यासाठी बाराही महिने पर्यटकांची गर्दी असते. त्यातही नोव्हेंबर ते मार्चदरम्यान पर्यटक सर्वाधिक असतात. देशातील पर्यटक, शाळांच्या सहली जानेवारी ते मार्च दरम्यान वेरूळ, अजिंठ्यात मोठ्या संख्येने येतात. एवढ्या मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. पुरातत्त्व विभाग, पर्यटन विभाग, स्थानिक प्रशासनाची ही जबाबदारी आहे. मात्र लेणी परिसरात आवश्यक सुविधा अजूनही म्हणाव्या तेवढ्या मिळत नसल्याची खंत आहे.

गेल्या काही महिन्यांपासून अजिंठा लेणीतील गैरसोयी आणि पर्यटकांवर होणारे मधमाश्यांचे हल्ले हा चिंतेचा विषय बनला आहे. सरकारी यंत्रणांकडून पुरविल्या जाणाऱ्या यंत्रणा पुरेशा आहेत की नाही, यंत्रणांमध्ये समन्वय आहे की नाही असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात. मधमाश्यांकडून पर्यटकांवर हल्ल्याच्या दरवर्षी किमान २० ते २५ घटना घडतात. मात्र अलीकडच्या काळात त्यात वाढ झाली आहे. पर्यटकांवर मधमाश्यांचा हल्ला झाला की तेवढ्यापुरती चर्चा होते. उपाययोजनांची मागणी केली जाते, जखमींवर उपचार करण्याचे औदार्य यंत्रणा दाखवतात. मात्र ठोस उपाययोजना होत नाहीत. लेणी परिसरात आग्या मोहोळाची दहापेक्षा जास्त पोळी असल्याचे सांगितले जाते. मधमाश्यांचे हल्ले झालेल्या लेणी परिसरात पर्यटकांना मज्जाव केला जातो, पण पुढे काही होत नाही. मागील वर्षी असे प्रकार घडल्यानंतर भारतीय पुरातत्त्व विभाग आणि वन विभागाने संयुक्त मोहीम राबवून पोळ्यांचा बंदोबस्त केला होता. यंदा मात्र अद्याप तसे काही झालेले नाही.

पर्यटकांवर मधमाश्यांनी केलेल्या हल्ल्याची तेवढ्यापुरती चर्चा होऊन थांबते. सरकारी यंत्रणांनी तातडीने उपाययोजना केल्या नाहीत तर अजिंठा लेणीला भेट देणाऱ्या पर्यटकांची कमी होण्याची भीती व्यक्त होत आहे. अजिंठा येथे प्रत्येक लेण्यासाठी पर्यटन विभागाने एक अटेंडंट दिला आहे. त्याच्याकडे लेण्याची संपूर्ण जबाबदारी दिलेली असते. परिसर स्वच्छतेसह अन्य पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम त्या अटेंडंटना करावे लागते. त्यांना योग्य तो मोबदला दिला जातो काय ? त्यांना येणाऱ्या अडचणी प्रशासनासकडून सोडविल्या जातात का, हे पाहणे गरजेचे आहे. अटेंडंटनी आपली जबाबदारी चोखपणे पाळणे अपेक्षित आहे. लेण्यामध्ये पोळे तयार होते हे तेथील यंत्रणेतील एकाही घटकाला कसे लक्षात येत नाही, असा प्रश्न आहे. कारण पोळे एका रात्रीत तयार होऊन वाढत नाही, त्यासाठी काही महिन्यांचा कालावधी लागतो. त्यानुसार एखाद्या लेण्यात जर मधमाश्यांचे पोळे तयार होताना दिसले तर तत्काळ वन विभाग, भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना लक्षात आणून दिले तर पोळे मोठे होण्याआधी त्याचा योग्य पद्धतीने बंदोबस्त करणे सोपे जाईल. पुरातत्त्व विभाग, वन विभाग, पर्यटन विभाग, स्थानिक प्रशासन यांच्यात यासाठी योग्य समन्वय असणे आवश्यक आहे. मात्र तो असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. लेणीची देखभाल, दुरुस्ती, सोयीसुविधा पुरविण्याची जबाबदारी पुरातत्त्व खात्याची आहे. मात्र ती पार पडताना त्रुटी राहत असल्याचे गेल्या काही दिवसांत झालेल्या मधमाश्यांच्या हल्ल्यांवरून स्पष्ट होते.

रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी हासुद्धा अडचणीचा विषय ठरला आहे. लेण्यापर्यंत पोचण्यासाठीचा मुख्य असलेला छत्रपती संभाजीनगर – जळगाव रस्त्याचे काम काही ठिकाणी अपूर्ण आहे. सिल्लोडजवळ रस्ता रुंदीकरण, काँक्रीटीकरणाचे काम रखडलेले आहे. पुलांची कामे अर्धवट आहेत. त्याचा पर्यटकांना फटका बसतो. ठिकठिकाणी होणारी वाहतूक कोंडी मनस्ताप वाढवते. लेणी परिसरापासून काही अंतरावर खासगी गाड्यांची पार्किंग आहे. तिथून लेणीपर्यंत पर्यटन विभागाच्या पर्यावरणपूरक वाहनांची व्यवस्था आहे.

या वाहनांची पुरेशी संख्या आहे काय? वाहनांची स्थिती कशी आहे? खासगी गाड्या पार्क केल्यानंतर त्यांची सुरक्षितता या सर्व बाबींवरही लक्ष देणे गरजेचे आहे. पर्यटकांना परत जाताना समाधान मिळेल, याची काळजी संबंधित यंत्रणांनी घेतली तर अजिंठा लेणीच्या वैभवात आणखी भर पडेल. देशीविदेशी पर्यटकांचे पर्यटन अधिक सुखकर होईल.

**– मकरंद कुलकर्णी**

# मेलडी क्वीन आशाताई काळाच्या पडद्याआड

**श्याम ठाणेदार, दौंड जि.पुणे**
**संपर्क : ९९२२५४६२९५**

गेली सात दशके आपल्या जादुई स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा रविवार दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वावरच नाही तर संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. आशाताईंच्या निधनाने केवळ संगीत विश्वाचीच नाही तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने संगीत विश्वाला वाहून घेतलेला आणि आपल्या जादुई स्वरांनी संपूर्ण संगीत विश्वावर अधिराज्य गाजवणारा शेवटचा तारा निखळला. भारतीय संगीत विश्व ज्यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही अशा मोजक्या कलाकारात त्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. ८ सप्टेंबर रोजीच आशाताईंचा ९२ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी त्यांचा उत्साह पाहता त्या वयाची शंभरी पार करतील असेच वाटत होते पण नियतीला हे मान्य नव्हते असेच म्हणावे लागेल. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांनी ३ तासांचा संगीत कार्यक्रम केला होता असे कोणाला सांगितले तर कोणाचा त्यावर विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये वयाच्या नव्वदीतही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा होती. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी होती की त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. तीन वर्षापूर्वी २४ मार्च २०२३ रोजी आशाताईंना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले होते तेव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता. यावेळी तेव्हाचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेले अनेक पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने



बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है हे गाणे गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आज थांबला. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरुवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले गं ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही गायली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. त्यांच्या निधनाने संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणारी मेलडी क्वीन काळाच्या पडद्याआड गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**मेलडी क्वीन आशाताईंना**
**भावपूर्ण श्रद्धांजली!**

# हत्याराविना कोट्यावधींच्या मनांवर राज्य करणारे: डॉ. बाबासाहेब आंबेडकर

जगाच्या इतिहासात सत्ता, साम्राज्य आणि 'राजा' या संकल्पना बहुधा तलवार, रक्तपात आणि जिंकलेल्या भूभागाशी जोडल्या गेल्या आहेत. अलेक्झांडर, चंगेज खान, नेपोलियन या साऱ्यांनी आपापल्या सामर्थ्याने जग जिंकण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या विजयामागे तलवारीचा धाक आणि हिंसेची सावली होती. मात्र या सर्वांच्या पलीकडे एक असा 'राजा' जन्माला आला, ज्याने ना कोणती तलवार उचलली, ना कोणावर आक्रमण केले; तरीही कोट्यावधी लोकांच्या मनांवर अधिराज्य गाजवले, तो म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

बाबासाहेब 'राजा' होते, पण सिंहासनावर नव्हे; ते होते विचारांच्या सिंहासनावर. त्यांनी सत्ता गाजवली, पण राज्यकर्त्यांसारखी नव्हे, तर समाजमनावर अधिराज्य गाजवणाऱ्या विचारवंतासारखी. त्यांनी जिंकले पण युद्धभूमीवर नव्हे, तर अन्यायाविरुद्धच्या संघर्षात, ज्ञानाच्या शक्तीने आणि तर्काच्या धारदार अस्त्राने. डॉ. आंबेडकरांचा जन्म समाजाच्या सर्वात तळागाळातील, अस्पृश्यतेच्या अमानुष बेड्यांत अडकलेल्या कुटुंबात झाला. ज्या समाजाने माणसाला माणूस म्हणून मान दिला नाही, त्या समाजात जन्म घेऊनही त्यांनी जगाला मानवतेचा खरा अर्थ शिकवला. त्यांच्या आयुष्याची सुरुवात अपमान, तिरस्कार आणि बहिष्काराने झाली. शाळेत पाणी पिण्याचा हक्क नव्हता, वर्गात बसण्याची जागा नव्हती, समाजात मान-सन्मान नव्हता. पण या साऱ्यांनी त्यांचा आत्मविश्वास खचवला नाही; उलट त्या अन्यायानेच त्यांच्या मनात क्रांतीची ठिणगी पेटवली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा मंत्र



घोषवाक्य नव्हता, तर जीवनाचा पाया होता.

शिक्षणाला त्यांनी केवळ वैयक्तिक उन्नतीचे साधन मानले नाही, तर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी अस्त्र बनवले. कोलंबिया विद्यापीठापासून लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सपर्यंत त्यांनी ज्ञानाची शिखरे गाठली; पण त्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी स्वतःसाठी नव्हे, तर वंचित, शोषित आणि पीडित समाजासाठी केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान केवळ कायदे लिहिण्यापुरते मर्यादित नाही. त्यांनी भारताच्या भवितव्याची दिशा ठरवली. समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी राज्यघटनेतून मूर्त रूप दिले. प्रत्येक भारतीयाला 'मानव' म्हणून जगण्याचा अधिकार त्यांनी दिला, हीच त्यांची खरी सत्ता. आज आपण ज्या लोकशाहीत जगतो, तिची भक्कम पायाभरणी बाबासाहेबांनी केली आहे. मतदानाचा अधिकार, समानतेचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे सर्व त्यांच्या विचारांचेच फलित आहे. ही सत्ता तलवारीने मिळवलेली नाही; ती मिळवलेली आहे संघर्ष, अभ्यास आणि तत्त्वनिष्ठतेच्या बळावर.

नेपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली. अस्पृश्यता, जातिभेद आणि अंधश्रद्धांविरुद्ध त्यांनी निर्भीडपणे लढा दिला. जातिव्यवस्था ही मानवतेवरचा कलंक आहे, असे ठामपणे सांगत त्यांनी परंपरांना प्रश्न विचारले, धर्मालाही आव्हान दिले आणि समाजाला नव्या विचारांकडे वळवले. महाडचा चवदार तळ सत्याग्रह असो किंवा काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन, प्रत्येक संघर्षात त्यांनी न्यायासाठी आवाज उठवला. त्यांनी हिंसेचा मार्ग स्वीकारला नाही; पण त्यांच्या विचारांची धार इतकी तीक्ष्ण होती की अन्यायाच्या भिंतीच हादरल्या. त्यांची क्रांती शांत होती पण परिणामकारक होती. 'एनिहिलेशन ऑफ कास्ट' सारख्या लेखनातून त्यांनी समाजातील विषमता उघड केली. त्यांचे विचार एका समाजापुरते मर्यादित नव्हते तर ते संपूर्ण मानवजातीसाठी होते.

आजच्या काळात बाबासाहेबांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. प्रगतीच्या युगातही विषमता आणि अन्याय कायम आहे. अशा वेळी त्यांचे विचारच आपल्याला दिशा देतात. ते सांगतात खरा विकास आर्थिकच नव्हे, तर सामाजिक आणि मानसिकही असतो. दुर्दैवाने, आज बाबासाहेबांना अनेकदा पुतळ्यांपुरते मर्यादित केले जाते. जयंतीला मिरवणुका निघतात, कार्यक्रम होतात पण त्यांच्या विचारांचे आचरण कितपत होते, हा प्रश्न कायम आहे. त्यांचे खरे स्मरण म्हणजे त्यांच्या विचारांचे अनुसरण. त्यांनी दिलेली सर्वात मोठी शिकवण म्हणजे स्वाभिमान. जोपर्यंत तुम्ही स्वतःला कमी समजता, तोपर्यंत कोणीही तुम्हाला उचलू शकत नाही, हा त्यांचा संदेश आजही तितकाच जिवंत आहे. त्यांनी समाजाला आत्मभान दिले, स्वत्वाची जाणीव करून दिली आणि संघर्षाची ताकद दिली.

आज बाबासाहेब केवळ एका समाजाचे नेते नाहीत; ते संपूर्ण राष्ट्राचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी लोकांच्या मनांवर जे राज्य केले आहे, ते कोणत्याही राजाच्या सत्तेपेक्षा मोठे आहे कारण ती सत्ता प्रेमाची, विश्वासाची आणि न्यायाची आहे. जगातील अनेक राजे विस्मरणात गेले पण बाबासाहेबांचे विचार आजही जिवंत आहेत प्रत्येक त्या मनात, जे अन्यायाविरुद्ध उभे राहते. आज त्यांच्या जयंतीनिमित्त, केवळ अभिवादन करून चालणार नाही. त्यांच्या विचारांना कृतीत उतरवणे, हीच खरी आदरांजली ठरेल. ज्ञान, समता, न्याय आणि बंधुतेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३६ व्या जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!

**– प्रविण बागडे, नागपूर**
**९९२३६२०९१९**

## रडू नको बेवड्या.... गाण्यावर बंदी घालावी !

सोळाव्या शतकात संत एकनाथांनी अभंग, ओव्या, भारूड आणि गवळण यांद्वारे लोकांना भक्तिमार्गाला लावण्यासह समाजजागृतीचे सुद्धा मोठे कार्य केले. साध्या, सोप्या आणि सरळ भाषेतील त्यांच्या गवळण ऐकणाऱ्यांच्या ओठांवर चटकन रुळतात. 'रडू नको बाळा मी पाण्याला जाते' ही त्यापैकीच एक प्रसिद्ध गवळण. आज ती अनेक ठिकाणी विशिष्ट चालीत गायली जाते. सुमीत म्युझिक कंपनीने शिवानी शिंदे या बालगायिकेच्या आवाजात ही गवळण ध्वनिमुद्रित केली आणि थोड्याच दिवसांत महाराष्ट्रातील घराघरांत पोहोचली. अल्प कालावधीत प्रसिद्ध झालेल्या गाण्यांमध्ये शिवानी शिंदेच्या या गवळणीचा विशेष उल्लेख करावा लागेल. ही गवळण आजच्या तरुण पिढीलासुद्धा भावली. या गवळणीचे पुढे डीजे व्हर्जन सुद्धा आले.मध्यंतरीच्या काळात या गवळणीवर नृत्य करून त्याच्या रिल्स बनवण्याचा ट्रेंडसुद्धा आला होता. रिल्स बनवण्याची आवड असणाऱ्या अनेक तरुण तरुणींसह सेलिब्रिटींनीसुद्धा या गवळणीवर त्यावेळी ठेका धरून रिल्स बनवल्या आणि सोशल मीडियावर अपलोड केल्या. त्यामुळे या गवळणीची विशिष्ट चाल आणि बोल लोकांच्या मनात आणि ओठांत कायमचे रुजले. पाणी आणण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या माता यशोदेच्या मागे हट्ट करून रडणाऱ्या बाळकृष्णाला समजवण्याच्या प्रयत्न माता यशोदा करत असल्याचा प्रसंग या गवळणीत मांडण्यात आला आहे. वात्सल्यभाव प्रकट करणारी ही गवळण ऐकताना ऐकणाऱ्याच्या अंतर्पटलावर तशाच प्रकारचे दृश्य उभे करते. हल्लीच एका लग्नाच्या वरातीत याच चालीवर बनवण्यात आलेले एक अत्यंत थुकरट आणि थिल्लर गाणे ऐकण्यात आले. रडू नको बाळा.... या गवळणीची चाल, लय आणि ठेका तसाच्या तसा कॉपी करून बनवलेल्या गाण्याचे बोल मात्र 'रडू नको बेवड्या तुला नाईन्टी पाजतो... नाईन्टी पाजतो तुला चकना मी देतो' अशा प्रकारचे विकृत स्वरूपाची होते. मद्य ढोसून ताळतंत्र सुटलेली मंडळी वरातीमध्ये या गाण्यावर अधिक जोमाने नाचताना दिसली. युट्युबवर माहिती घेतल्यावर मोनू अजमेरी यांनी हे गाणे लिहिले असून अविनाश पवार याने ते गायले असल्याचे समजले. एनएस म्युजिकच्या यु ट्यूब चॅनलवर हे गाणे आजही उपलब्ध आहे. पवित्र वात्सल्य भाव आणि भगवान श्रीकृष्णाच्या लीलांचे सुरेख मिश्रण असलेल्या एकनाथ महाराजांच्या गवलणीला सुरेख चाल आणि संगीत दिल्यामुळे ते लोकांच्या मनात आणि घराघरांत पोहोचले आता त्याच चालीवर विकृत गाणे ऐकावे लागत आहे. अशा प्रकारची विकृती ही केवळ संत एकनाथ महाराज यांच्या गवळणीचाच अवमान करणारी नसून ही गवळण ज्या भगवान श्रीकृष्णाच्या लीलांचे वर्णन करण्यासाठी सिद्ध करण्यात आली आहे त्या जगनियंत्या भगवान श्रीकृष्णाचाही अवमान आहे. समाजातील मद्यपींच्या विकृत भावना जोपासण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या थिल्लर गाण्यावर त्वरित बंदी आणून ही विकृती तयार करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा !


**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# माथेरान मध्ये राजकीय घडामोडींना वेग माजी नगरसेवक व ई-रिक्षाचालकांचा भाजपमध्ये प्रवेश

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१२, माथेरान :** माथेरान शहरातील प्रलंबित प्रश्न आणि विशेषतः ई-रिक्षा विषयाच्या पार्श्वभूमीवर आज महत्त्वाची राजकीय घडामोड घडली. शहरातील माजी नगरसेवक दिनेश सुतार, संतोष लखन आणि संतोष शिंदे यांच्यासह एकूण १५ ई-रिक्षा चालकांनी पनवेल येथे भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.



पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. प्रशांतदादा ठाकूर यांच्या उपस्थितीत पक्ष कार्यालयात हा प्रवेश सोहळा पार पडला.या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी माथेरानमधील विविध प्रलंबित प्रश्नांसह ई-रिक्षा चालकांचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे स्पष्ट आश्वासन दिले. या कार्यक्रमाला माथेरान शहराध्यक्ष प्रविण सकपाळ, आकाश चौधरी, राजेश चौधरी, संतोष शेलार, प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव, किरण चौधरी, सौरभ घावरे, शंतनू जमदाडे, चैतन्य शिंदे आदी उपस्थित होते.

दरम्यान, माथेरानमधील ई-रिक्षा प्रश्न गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित राहिला असून, संबंधित मॉनिटरिंग कमिटी हा विषय प्रभावीपणे हाताळत नसल्याची नाराजी चालकांमध्ये आहे. वारंवार तारखा दिल्या जात असतानाही कोणताही ठोस निर्णय न झाल्याने अनेक रिक्षा धारकांनी उपोषण आंदोलनाचा मार्ग स्वीकारला होता. मात्र, त्यानंतरही प्रश्न सुटलेला नसल्याने चालकांमध्ये असंतोष वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर आता हा प्रश्न थेट राज्याच्या सर्वोच्च स्तरावर नेण्याची भूमिका घेतली जात आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः या प्रकरणात मध्यस्थी करून उर्वरित पात्र ई-रिक्षा धारकांना रिक्षा उपलब्ध करून द्याव्यात, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

राज्यात भारतीय जनता पार्टीचे सरकार असल्यामुळे या प्रश्नाला न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त करत संबंधितांनी भाजपमध्ये प्रवेश केला असल्याचे स्पष्ट झाले आहे. या एकत्रित घडामोडींमुळे माथेरानमधील ई-रिक्षा प्रश्नाला आता राजकीय गती मिळाली असून, आगामी काळात यावर ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अहिल्यानगरमध्ये महिला बचत गटांची 'लोकल टू ग्लोबल' भरारी..!

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१२, अहिल्यानगर :** केवळ बचतीपुरती मर्यादित न राहता, जिल्ह्यातील बचत गटांची चळवळ आता परिवर्तनाचे प्रभावी साधन बनली आहे. जिल्ह्यात सध्या ३० हजार ११२ बचत गट सक्रिय असून, त्यांच्याशी ३ लाख १५ हजारांहून अधिक महिला जोडल्या गेल्या आहेत. या गटांना बँकांशी जोडून १६८ कोटी २० लाख रुपयांच्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असताना, प्रत्यक्षात तब्बल ३५३ कोटी ०९ लाख रुपयांचे विक्रमी कर्जवाटप करण्यात आले आहे. या भक्कम आर्थिक पाठबळाम ुळे महिलांनी आत्मनिर्भरतेची नवी पहाट अनुभवत 'लोकल टू ग्लोबल' ही संकल्पना प्रत्यक्षात साकारली आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उम ेद), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि महिला व बाल विकास विभाग यांच्या समन्वयातून अहिल्यानगर जिल्ह्यातील महिला स्वयं सहाय्यता बचत गटांनी सक्षमीकरणाची ही दमदार भरारी घेतली आहे.

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'लखपती दीदी' उपक्रमातही जिल्ह्याने आघाडी घेतली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी १ लाख ८० हजार ४४४ महिलांना लखपती बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यापैकी १ लाख ३७ हजार २३४ महिलांनी हा टप्पा यशस्वीपणे गाठला आहे.



या भांडवलाच्या बळावर आणि शासनाच्या प्रशिक्षण सुविधांच्या मदतीने महिलांनी उद्योगनिर्मितीच्या क्षेत्रात भक्कम पाऊल टाकले आहे. मसाले, पापड, लोणची, बेकरी उत्पादने, हस्तकला, मेणबत्त्या आणि रेडीमेड कपडे यांसह दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व भाजीपाला उत्पादन अशा शेतीपूरक व्यवसायातही महिलांनी मोठी झेप घेतली आहे.

महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आणि ग्रामसंघांच्या माध्यमातून सामूहिक खरेदी-विक्री तसेच कृषी सेवा केंद्रांची उभारणी करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना दिली जात आहे.

दर्जेदार उत्पादन, स्थानिक चव आणि आकर्षक पॅकेजिंगच्या जोरावर महिलांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळत आहे. यासाठी जिल्हास्तरावर प्रदर्शने आणि मेळावे आयोजित केले जात असून, डिजिटल तंत्रज्ञानाचाही प्रभावी वापर केला जात आहे.

उमेद अभियानांतर्गत तयार करण्यात आलेल्या 'उमेद मार्ट' या ई-व्यापार प्लॅटफॉर्मवर जिल्ह्यातील सुमारे १८० उत्पादने ऑनलाईन विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. समाजमाध्यमांच्या म ाध्यमातून ही उत्पादने राज्याबाहेरील तसेच देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचत असून, विक्रीत लक्षणीय वाढ होत आहे.

या प्रक्रियेतून स्थानिक पातळीवर अनेक यशस्वी उद्योजिका पुढे आल्या आहेत. अहिल्यानगर तालुक्यातील मीरा बेरड (स्वामी समर्थ गट), संगम नेरच्या शोभना सोनावणे (माई गट) आणि ज्योती संस्कर (मी उद्योजिका), पारनेरच्या शिल्पा बेलोटे (राधिका गट), श्रीगोंद्याच्या शीतल गवते, नगरच्या विनया मुळे (श्रीकृष्ण गट) व अश्विनी कोळपकर, श्रीरामपूरच्या ज्योती जगताप व साक्षी आघाडे (साई समृद्धी) तसेच अकोले येथील शीला इदे (संधान गट) यांनी आपली उत्पादने 'ब्रँड' म्हणून विकसित करत स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

या आर्थिक प्रगतीमुळे पूर्वी कुटुंबात दुय्यम स्थान असलेल्या महिला आज निर्णयक्षम आणि नेतृत्वक्षम नागरिक म्हणून पुढे येत आहेत. उत्पन्नात वाढ झाल्याने मुलांच्या शिक्षणाला चालना मिळाली असून, कुटुंबाचे आरोग्य आणि जीवनमानही सुधारले आहे.

'स्वतः सक्षम व्हा आणि समाजालाही सक्षम करा' हा संदेश देत महिला बचत गटांनी निर्माण केलेला हा आदर्श जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका बजावत आहे.

# अहिल्यानगर शहरातील माळीवाडा वेस पाडण्यावरून न्यायालयीन लढा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** नगर शहरातील ऐतिहासिक ओळख असलेल्या माळीवाडा वेस पाडण्याच्या हालचालींच्या विरोधात अखेर न्यायालयीन लढा उभारण्यात आला असून शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे गटनेते दत्तात्रय हरिभाऊ कावरे यांनी संभाजीनगर खंडपीठात जनहित याचिका दाखल करीत प्रशासनाला थेट आव्हान दिले. शहराच्या वारशावर घाला घालणाऱ्या या निर्णयाविरोधात नागरिकांमध्ये संताप उसळला असून आता हा वाद न्यायालयात पोहोचला आहे.

जनहित याचिकेत जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पुरातत्त्व विभाग, पोलिस अधीक्षक व महापौर यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. गेल्या वर्षभरापासून नगर शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, खड्ड्यांनी विद्रूप झालेले मार्ग आणि अपूर्ण विकासकामे यावरून प्रशासनावर टीका होत असतानाच माळीवाडा वेस पाडण्याचा मुद्दा समोर आल्याने नागरिकांचा रोष आणखी वाढला आहे. शहरातील मूलभूत प्रश्न सोडवण्यात



अपयशी ठरलेल्या यंत्रणेला अचानक ऐतिहासिक वास्तू पाडण्याची घाई का झाली, असा सवाल उपस्थित होत आहे.

माळीवाडा वेस ही सुमारे चारशे वर्षांची ऐतिहासिक वास्तू असून तिचे जतन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना उलट ती पाडण्याचा निर्णय घेण्यात आल्याने अहिल्यानगर शहरातील जनतेत संताप व्यक्त होत आहे. सहा महिन्यांन पूर्वीच या विरोधात नितीन भुतारे यांनी आवाज उठवत नागरिकांना जागरूक केले होते.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतही या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली होती. माळीवाडा परिसरातील बाळासाहेब बोराटे, सुरेखा कदम, मंगलताई लोखंडे, दत्ता कावरे या नगरसेवकांनी वेस पाडण्यास कडाडून विरोध दर्शवला, तर सत्ताधाऱ्यांनी विकास या नावाखाली येथे महात्मा फ ुले यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्याचा मुद्दा पुढे करत वेस पाडण्याची भूमिका घेतली, या भूमिकेमुळे सत्ताधाऱ्यांनी प्रशासनावर दबाव आणल्याची चर्चा रंगू लागली आहे.

याचिकेसोबत माळीवाडा वेस ऐतिहासिक असल्याचे पुरातत्व विभागाचे पत्र, चारशे वर्षांचा इतिहास तसेच यापूर्वी नागरिकांनी दाखल केलेल्या सुमारे २ हजार हरकतींचा तपशीलही न्यायालयासमोर सादर करण्यात आला आहे. दुसरीकडे याचिका दाखल करताना कावरे यांनी दिल्लीच्या पुरातत्व विभागाचे काही दाखले सुद्धा या समवेत दिलेले आहेत. लवकरच पुढील प्रक्रिया होण्याची अपेक्षा असल्याचे याचिकाकर्ते नगरसेवक दत्ता कावरे म्हणाले.

# थोडक्यात

## चतुरस्त्र सूर हरपला ! आ.मुनगंटीवार यांची आशाताई भोसले यांच्या निधनाबद्दल हृदयस्पर्शी शोकसंवेदना

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१२, चंद्रपूर :** भारतीय संगीतविश्वाला आपल्या स्वरांनी मोहिनी घालणाऱ्या, सुरांच्या माध्यमातून कोट्यवधी रसिकांच्या आयुष्यात आनंद, वेदना आणि भावना जिवंत ठेवणाऱ्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायी असून, भारतीय संस्कृतीच्या आकाशातील एक तेजस्वी तारा, चतुरस्त्र सूर आज कायमचा लोप पावला आहे, अशा अत्यंत भावुक शब्दांत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या आहे.

आशाताई म्हणजे केवळ एक गायिका नव्हत्या, तर त्या एक युग होत्या. एक अखंड वाहणारी सुरांची गंगा होत्या. त्यांच्या प्रत्येक गीतामध्ये भावना जिवंत व्हायच्या, प्रत्येक सुरामध्ये जीवनाचा स्पंदन असायचे . त्यांच्या आवाजाने अनेक पिढ्यांच्या सुख-दुःखांना शब्द आणि स्वर दिले. त्यामुळेच त्यांचे जाणे हे केवळ एका व्यक्तीचे निधन नसून, एका संपूर्ण सांस्कृतिक पर्वाचा अंत असल्याची जाणीव मनाला चटका लावणारी आहे, असे त्यांनी नमूद केले.

माझ्या सांस्कृतिक कार्यमंत्री पदाच्या कार्यकाळात आशाताईंना महाराष्ट्र भूषण हा सन्मान देण्यात आला हे मी माझे परमभाग्य समजतो.

सांस्कृतिक कार्यमंत्री म्हणून कार्य करत असताना आशाताईंशी अनेकदा भेटण्याचा योग आला होता. त्या प्रत्येक भेटीत त्यांचे साधेपण, आत्मीयता आणि कलेप्रती असलेली अविचल निष्ठा मनाला स्पर्शून जायची. त्यांच्याशी झालेल्या त्या संवादांच्या, त्या क्षणांच्या आठवणी आज मनाला खोलवर भिडत आहेत. आज त्या आठवणींचाच आधार घेऊन त्यांना स्मरावे लागत आहे, हीच सर्वात मोठी वेदना असल्याची भावना सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

आशाताईंचा स्वर आज जरी शांत झाला असला, तरी त्यांचे गीत, त्यांची कला आणि त्यांचा अमर वारसा काळाच्या पलीकडे जिवंत राहील. त्यांच्या सुरांचा गंध हा युगानुयुगे भारतीयांच्या मनात दरवळत राहील. ईश्वर त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना या अपार दुःखाचा सामना करण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## ३१ लाखांच्या मुद्देमालासह २७ जनावरे जप्त तस्करांच्या मुसक्या आवळल्या !



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** गोवंश जनावरांना कत्तलीसाठी नेत असलेल्या तस्करांवर गुन्हे शाखेने प्रहार केला असून, चंद्रपुरात ५ आरोपींवर गुन्हा दाखल करीत २७ जनावरांसह ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१२ एप्रिलला चंद्रपुर शहरात गुन्हे शाखेचे पथक गस्त घालीत असतांना गोवंश जनावरांची वाहतुक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पडोली ते घुग्घुस मार्गावरील खुटाळा येथे गुन्हे शाखेने सापळा रचला. यावेळी ट्रक क्रमांक एपी ०७ टीयू ३४९९ ला थांबवित त्याची झडती घेतली असता त्यामध्ये २७ जनावरे आढळली. सर्व जनावरे तेलंगणा राज्यात कत्तलीसाठी नेत होते. याप्रकरणी एकाला अटक तर ५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीमध्ये २२ वर्षीय दानिश अब्दुल हमीद कुरेशी रा. व्याहाड खुर्द सावली, तेलंगणा राज्यातील समीर उर्फ सोहेल, गडचांदूरातील सादिक कुरेशी, राजुऱ्यातील समीर खान मूसावीर खान, कागजनगर मधील अजीम उर्फ अजु शेख यांचा समावेश आहे.

२७ जनावरे, एक ट्रक व चारचाकी वाहनासह पोलिसांनी एकूण ३१ लाखांचा मुद्देमाल या कारवाईत जप्त केला. सुरक्षेच्या दृष्टीने २७ जनावरे प्यार फाउंडेशन मध्ये जमा करण्यात आले. आरोपींवर पडोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पोउपनि विनोद भुरले, पोउपनि सुनील गौरकार, पोलीस कर्मचारी सुभाष गोहोकर, सतीश अवथरे, रजनीकांत पुठ्ठावार, दीपक डोंगरे, इम्रान खान, हिरालाल गुप्ता, किशोर वाकाटे, शशांक बदामवार, सुमित बरडे, कार्तिक खनके आणि राहुल पोंदे यांवी केली.

# विंचूरच्या 'श्रीराम चौकात' प्रवाशांचे हाल; उन्हाचा तडाखा आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** नाशिक-संभाजीनगर महामार्गावर विंचूर येथील तीन पाटी (श्रीराम चौक) भागात सध्या रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, या विकासकामाच्या गडबडीत सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षिततेचा आणि सुविधेचा पूर्णपणे विसर पडल्याचे चित्र दिसत आहे. महामार्गावर सध्या कामामुळे उभे राहण्यासाठी जागा नसल्याने आणि सावलीचा आधार नसल्याने प्रवाशांना जीव मुठीत धरून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे.




**एकेरी वाहतूक आणि अपघाताची भीती**

सध्या महामार्गाचे काम सुरू असल्याने चार पदरी वाहतूक थांबवून केवळ एका बाजूने वाहतूक वळवण्यात आली आहे. यामुळे श्रीराम चौकात प्रचंड गर्दी होत असून, प्रवाशांना उभे राहण्यासाठी साधी जागाही शिल्लक राहिलेली नाही. भरधाव वाहनांच्या वर्दळीत रस्त्यावर उभे राहणे धोक्याचे बनले असून, एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रवाशांना उन्हाच्या झळा**

एकीकडे उन्हाचा पारा वाढत असताना, दुसरीकडे प्रवाशांसाठी या चौकात कोणताही निवारा उपलब्ध नाही. लहान मुले, वृद्ध , अपंग आणि आजारी प्रवाशांना तासन्तास रणरणत्या उन्हात उभे राहावे लागत आहे. बस वेळेवर येत नसल्याने प्रवाशांचे हाल अधिकच वाढत आहेत.

> रस्त्याचे काम होणे गरजेचे आहेच, पण प्रशासनाने प्रवाशांच्या जीवाशी खेळू नये. म हिलांची होणारी गैरसोय पाहवत नाही. तातडीने सर्व बस बसस्थानकात जाणे गरजेचे आहे.
>
> **- विंचूर पंचक्रोशीतील नागरिक**

**महिलांची कुचंबणा: प्रसाधनगृहाचा अभाव**

सर्वात गंभीर बाब म्हणजे, तीन पाटी परिसरात महिलांसाठी साधे स्वच्छतागृह किंवा शौचालय उपलब्ध नाही. दूरवरून येणाऱ्या महिला प्रवाशांची यामुळे मोठी कुचंबणा होत आहे. परिसरात सुविधा नसल्याने महिलांना उघड्यावर जावे लागते, ही अत्यंत संतापजनक आणि मानहानीकारक बाब असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या :**

**बसस्थानकात बस नेणे अनिवार्य करा:** महामार्गावर उभे राहणे धोक्याचे असल्याने सर्व बसेस (एसटी) मुख्य बसस्थानकात नेण्यात याव्यात, जेणेकरून प्रवाशांना सुरक्षित ठिकाणी बसता येईल.

**तात्पुरता निवारा :** जोपर्यंत काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत प्रवाशांसाठी शेड किंवा सावलीची व्यवस्था करावी.

**स्वच्छतागृहाची सोय :** श्रीराम चौक परिसरात महिलांसाठी तातडीने फिरते शौचालय किंवा कायम स्वरूपी प्रसाधगृह उभारण्यात यावे.

आता या प्रश्नावर प्रशासन आणि परिवहन विभाग काय पाऊल उचलते, याकडे संपूर्ण विंचूरकरांचे लक्ष लागले आहे.